# मुंबई विद्यापीठ
## विद्यार्थी कल्याण विभाग

क्र. वि.क.वि./२७/२०१५

डॉ. मृदुल निळे.
प्र.संचालक,

विद्यापीठ विद्यार्थी भवन,
'ब' पथ, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

परिपत्रक :

**विषय : आदिवासी भागातील अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी (आर्थिक सहाय्य).**

महोदय / महोदया,

मुंबई विद्यापीठाशी सलंग्न असलेली व आदिवासी भागातील महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यामधून शिकणाऱ्या अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य शैक्षणिक वर्ष २००६-२००७ या वर्षापासून सुरू करण्यात आली. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष **२०१५-१६** साठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील आदिवासी भागातील अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनेसाठी सोबत जोडलेल्या नमुन्यातील अर्ज विद्यार्थ्यांकडून भरून घ्यावेत. विद्यार्थ्यांचे अर्ज खालील सर्व गोष्टींची पूर्तता करून **शुक्रवार, दिनांक २० नव्हेंबर २०१५** पर्यंत आपल्या शिफारीशींसह या कार्यालयास पाठवावेत. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सदर विद्यार्थ्यांची माहिती खालील तक्त्याप्रमाणे सादर करावी.**

| विद्यार्थ्यांचे नाव | लिंग मुलगा/मुलगी | कोणत्या वर्गात शिकत आहे | प्रवर्ग/जात | पालकांचे उत्पन्न | राष्ट्रीयकृत बॅकेतील वैयक्तिक खाते क्र. व बॅकेचे नाव | शिष्यवृत्ती प्रदान करण्याबाबत अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**अर्ज सादर करताना खालील गोष्टींची पूर्तता करणे अपेक्षित आहे :**

१. प्रत्येक महाविद्यालय/संस्थांमधील आदिवासी भागातील अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांचेच अर्ज स्वीकारले जातील.
२. अर्ज विद्यार्थ्यांनी स्वत: भरून दयावा
३. प्राधिकृत अधिकाऱ्यांने दिलेल्या जातीच्या प्रमाणित पत्राची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.
४. मागील वर्षाचे कुटुंबाच्या उत्पन्नाचा प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेला दाखला जोडणे आवश्यक आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रूपये १,००,०००/- पेक्षा जास्त नसावे. (पालकांचे उत्पन्न कायम स्वरूपी नसल्यास त्या बाबत प्राचार्यांनी दाखला दयावा)
५. सन् २०१५-२०१६ मध्ये शैक्षणिक शुल्क भरल्याच्या पावतीची प्रमाणित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
६. विद्यार्थ्यांस यापूर्वी दुसऱ्या कोणत्याही शासकीय अथवा इतर योजनेखाली आर्थिक सहाय्य मिळाले असल्याची त्यासंबंधी माहिती द्यावी.
७. दिलेल्या वेळेत अर्ज सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची व प्राचार्य/ संचालक यांची राहिल.
८. विद्यार्थ्यांच्या मागील शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या परिक्षेची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.
९. विद्यार्थ्यांच्या ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत जोडावी.
१०. वरील सर्व गोष्टींची पूर्तता न केल्यास अर्ज बाद केला जाईल.
**११. सर्व विद्यार्थ्यांची यादी C.D. मध्ये इंग्रजी तसेच मराठीत, शिवाजी/कृतीदेव या वर्णशैलीत देण्यांत यावी.**
१२. आधार कार्डाची छायांकितप्रत अर्जासोबत जोडावी.

**प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुखांसाठी सूचना :**

अ. विद्यार्थ्यांसाठी सदर व योजनेची माहिती ठळकपणे सूचना फलकात प्रसिध्द करावी. पात्र विद्यार्थ्यांना अर्ज उपलब्ध करून द्यावे व त्याची छाननी करून पाठवावेत.
ब. अर्ज सादर करताना वरील सर्व गोष्टींची पूर्तता झाली आहे याची खात्री करावी.
क. अपूर्ण अर्जांचा आणि **शुक्रवार, दिनांक २० नव्हेंबर २०१५** नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
ड. तसेच वय वर्षे २५ पुर्ण झालेल्या विद्यार्थ्याला/विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेता येत नाही याची नोंद घ्यावी.

( डॉ. मृदुल निळे.)
प्र.संचालक

मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २४ सप्टेंबर,२०१५.

प्रति,
माननीय कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई - ४०० ०३२.

**विषय - शैक्षणिक मदत (आर्थिक सहाय्य) मिळण्याबाबत.**

महोदय,

मी कुमार/कुमारी ------------------------------------------------------------------
------------------------ -----------------------महाविद्यालयात शिकत आहे. मी आर्थिकदृष्टया मागासवर्गीय गटात असून मला खालीलप्रमाणे आर्थिक मदत मिळावी हि विनंती. माझ्यासंबंधीची संपूर्ण माहिती खाली देत आहे.

१) पूर्ण नांव :- ------------------------------------------------------------

२) वडिलांचे नाव :- ------------------------------------------------------------

३) वर्ग/अनुक्रमांक :- ------------------------------------------------------------

४) वर्ग व जात :- अनुसूचित जमाती (प्रधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणप्रत्राची प्रमाणित प्रत सोबत जोडावी)

५) जन्मतारीख :- ---------------------------------------------- (दाखला जोडावा)

६) मागील वर्षाचे कुटूंबाचे एकूण उत्पन्न :- रूपये ------------------------------------------
कुटूंबातील अवलंबून असणाऱ्यांची संख्या :- -----------------------------------------------
(या संबंधीचा संबंधीत अधिका-याचा दाखला जोड ावा)

७) सध्याचा पत्ता :- -------------------------------------------------------
-------------------------------------------------------
दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक -------------------------

८) कायमचा पत्ता :- -------------------------------------------------------
-------------------------------------------------------
-------------------------------------------------------

९) कोणत्या कारणासाठी शैक्षणिक मदत / प्रतिपूर्ती पाहिजे त्याचा तपशील :-

अ) वार्षिक फी रु ---------------------------
ब) इतर फी असल्यास रु ---------------------------
(वरील सर्व फी भरल्यास पावतीची सत्यप्रमाणित प्रत जोडावी)

१०) शासनाकडून/विद्यापीठाकडून काही शिष्यवृत्ती/फ्री शिप मिळत असल्यास त्याचा तपशील :-------------------------------------------------------
(कोणत्या कारणासाठी शिष्यवृत्ती /फ्री शिप मिळते ते लिहावे)

११) राष्ट्रीयकृत बॅंकेतील वैयक्तिक खाते क्र. व बॅंकेचे नाव .: ---------------------------------------

वरील माहिती खरी असून, ही माहिती खोटी आढळल्यास माझ्यावर कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार विद्यापीठास असेल.

दिनांक :____________________ विद्यार्थ्याचे नांव व सही

वरील माहिती विभागातील नोंदीनुसार पडताळून पाहण्यात आली आहे व ती योग्य असल्याचे आढळले आहे. तरी सदर विद्यार्थ्यांची शिफारस मी मागासवर्गीय आर्थिक सहाय्य मिळण्यास करीत आहे.

प्राचार्यांची
(सही व शिक्का)

दिनांक :...____________________.

सोबत : ओळखपत्रांची छायांकित प्रत
जातीच्या दाखल्याची छायांकित प्रत
उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत
फी ची छायांकित प्रत
गुणपत्रिकेची छायांकित प्रत